सन २०१७-१८ करिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता ₹२४.५५२१ कोटी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: राकृवि ०८१७/प्र.क्र. ९५/राकृवियो कक्ष

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ३१ मार्च, २०१८

वाचा :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. ०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. १३.०४.२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
३. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१७-आरकेव्हीवाय, दि. १५.०५.२०१७
४. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७ आरकेव्हीवाय/३, दि. १६.०६.२०१७
५. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि.०३.०७.२०१७
६. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०८१७/प्र.क्र. ९५/राकृवियो कक्ष, दि.०३.१०.२०१७
७. कृषि व पदुम विभागाचा शासन शुद्धीपत्रक क्रमांक: राकृवि ०८१७/प्र.क्र .९५/राकृवियो कक्ष, दि.२४.१०.२०१७
८. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७-आरकेव्हीवाय/३, दि.३१ जानेवारी, २०१८
९. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०८१७/प्र.क्र. ९५/राकृवियो कक्ष, दि.०१.०३.२०१७
१०. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०३१७/प्र.क्र. २३/राकृवियो कक्ष, दि.२८.०३.२०१७
११. आदिवासी विकास विभागाचे ज्ञापन क्र.पुनर्वि-२०१८/प्र.क्र.४५/कार्या.६,दि.१५.३.२०१८
१२. आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१७/प्र.क्र. ११/कार्यासन.६, दि.३१.०३.२०१८

प्रस्तावना :

राष्ट्रीय कृषि विकास योजना (राकृवियो) केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० प्रमाणाच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेस (राकृवियो) सन २०१७-१८ करिता केंद्र शासनाने दि. १५/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र हिस्यासाठी ₹३९.३७ कोटी व राज्य हिस्यासाठी ₹२६.२४ कोटी असे एकूण ₹६५.६१ कोटी नियतवाटप

(Allocation) मंजूर केले. सदर नियत वाटपाच्या अनुषंगाने संदर्भांकित दि. ०३ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

संदर्भाधिन दि.१६ जुन, २०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राज्यास केंद्र हिस्याचा पहिल्या हप्त्यात ₹ १९.६७ कोटी निधी वितरीत केला होता व त्या समरुप राज्य हिस्स्याचा रु. १३.११३ कोटी निधी आवश्यक होता. तत्कालिन स्थितीत केवळ केंद्र हिस्याची तरतुद उपलब्ध असल्याने ₹१९.६७ कोटी निधी संदर्भाधिन दि.०३ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला होता. त्यानंतर संदर्भाधिन दि.०१ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य हिस्याचा ₹५.५४३३ कोटी निधी वितरित केलेला आहे तथापि, ₹७.५६९७ कोटी निधीचे वितरण अद्याप बाकी आहे. केंद्र शासनाने संदर्भाधिन दि.३१ जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाचा दुसऱ्या हप्त्याव्दारे ₹१०.१९ कोटी निधी वितरीत केला आहे, त्यास अनुसरुन राज्य हिस्याचा ₹६.७९३ कोटी निधी वितरण आवश्यक आहे.

अशाप्रकारे, पहिल्या हप्त्यातील बाकि असलेला राज्य हिस्स्याचा रु.७.५६९७ कोटी निधी व दुसऱ्या हप्त्यातील केंद्र हिस्याकरिता समरुप राज्य हिस्याचा आवश्यक ₹ ६.७९३ कोटी निधी असा एकूण ₹१४.३६२७ कोटी राज्य हिस्स्याचा निधी, आणि दुसऱ्या हप्त्यातील केंद्र हिस्स्याचा ₹ १०.१९ कोटी निधी असा केंद्र व राज्य हिस्याचा मिळून एकूण ₹२४.५५२७ कोटी निधी आवश्यक होता. आदिवासी विकास विभागाने संदर्भांकित ज्ञापन दि.१५.०३.२०१८ व शासन निर्णय दि.३१.०३.२०१८ अन्वये राज्य हिस्स्याचा ₹ १४.३६२१ कोटी निधी कृषि विभागास वितरित केला असून, सदर निधी आयुक्त (कृषि) यांना वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः

१. सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता केंद्र व राज्य हिस्स्याचा मिळून एकूण ₹ २४.५५२१ कोटी निधी (रुपये चोवीस कोटी पंचावन्न लाख एकवीस हजार फक्त) आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे, सदर निधीचे केंद्र व राज्य हिस्याचे विवरण पुढीलप्रमाणे-

(रक्कम ₹ कोटी)

अ. क्र.	योजनेचे नाव	अनुसूचित जमाती प्रवर्ग		एकूण
		राज्य हिस्सा (४०%)	केंद्र हिस्सा (६०%)	
१.	राष्ट्रीय कृषि विकास योजना	१४.३६२१	१०.१९	**२४.५५२१**

२. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती करिता वितरीत केलेला केंद्र हिस्याचा ₹१०.१९ कोटी (रुपये दहा कोटी एकोणीस लाख फक्त) आणि राज्य हिस्याचा ₹ १४.३६२१ कोटी निधी (रुपये चौदा कोटी छत्तीस लाख एकवीस हजार फक्त) सन २०१७-१८ करिता पुढील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा -

प्रवर्ग	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
अनुसूचित जमाती	**मागणी क्रमांक टी -५** २४०१- पीक संवर्धन ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (२८) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ A७४४) ३३-अर्थसहाय्य	**मागणी क्रमांक टी -५** २४०१- पीक संवर्धन ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना ०१- जनजाती उपयोजनेंतर्गत योजना (०१) (२९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ A७५३) ३३-अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹ २४.५५२१ कोटी रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे .

४. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेली ₹ २४.५५२१ कोटी रक्कम कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) मध्ये जमा करावी व तसे शासनास अवगत करावे आणि तद्‌नंतर सदर निधी संबंधित प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी विविध अंमलबजावणी यंत्रणांना वर्ग करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता पुढील अंमलबजावणी यंत्रणांना ₹२४.५५२१ कोटी निधी वितरीत करण्यात येत असून त्याबाबतचा प्रकल्प निहाय तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केला आहे व त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे :-

(रक्कम ₹ कोटी)

अ.क्र.	वितरीत निधीचा अंमलबजावणी यंत्रणानिहाय तपशील	वितरीत निधी
१	आयुक्त (कृषि)	७.७२२१
२	आयुक्त (साखर)	१.४५
२	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ	१५.३८
	एकूण	२४.५५२१

६. या शासन निर्णयान्वये केवळ ‘अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता’ निधी वितरीत करण्यात आला असून आयुक्त (कृषि) यांनी त्यांना मंजूर केलेल्या प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आवश्यक असलेल्या निधीकरिता उपरोक्त रकमेचा विनियोग करावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार तसेच आदिवासी विभागाच्या संदर्भांकित ज्ञापन दि.१५.०३.२०१८ व शासन निर्णय दि.३१.०३.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या निधी वितरणाच्या अनुषंगाने व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३१२११६२७४८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.31 22:59:47 +05'30'

सहपत्र : परिशिष्ट -अ

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
२. मा.मंत्री (कृषि व फलोत्पादन), मंत्रालय, मुंबई
३. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा. संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य/महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१३.संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१४.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१५.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१७.सहायक संचालक (लेखा-१), कृषिआयुक्तालय, पुणे
१८. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१९.निवड नस्ती.

परिशिष्ट - अ

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्र. राकृवि-०८१७/प्र.क्र.९५/राकृवियो कक्ष, दि.३१/०३/२०१८ चे सहपत्र

वर्ष-२०१७-१८ **(रक्कम ₹ कोटी)**

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव व अंमलबजावणी यंत्रणा	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	प्रकल्पांची मंजूर / उर्वरित प्रकल्प किंमत (नवीन / जुने प्रकल्प)	२०१७-१८ करिता मंजूर नियतवाटप (सर्वसाधारण+ अ.जा.+ अ.ज.)	या शासन निर्णयान्वये अनुचीत जमाती प्रवर्गारिता वितरित करण्यात येत असलेला निधी
१	२	३	४	५	६
१	उन्नत शेती - समृद्ध शेतकरी मोहिम अंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्प	१७-१८	२००.००	२००.००	७.७२२१
संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण)		**एकूण**	**२००.००**	**२००.००**	**७.७२२१**
आयुक्त (कृषि)		**एकूण**	**२१०.९२**	**२१०.९२**	**७.७२२१**
२	उस तोडणी यांत्रिकीकरण	१७-१८	१५.००	१५.००	१.४५
आयुक्त (साखर)		**एकूण**	**१५.००**	**१५.००**	**१.४५**
३	राज्यातील १० ठिकाणी गोदामांची निर्मिती करुन तेथे वखार पावती सुविधा व ऑनलाईन ट्रेडींग सुविधा उपलब्ध करुन देणे	१७-१८	१२.३२	१२.३२	२.८८
४	थेट पणन सुविधेकरिता वखार महामंडळाच्य गोदामांचे क्षतिग्रस्त ॲस्बेसटॉस पत्र्यांच्या छताऐवजी गॅल्व्हालाईन पत्र्यांचे नवीन छत निर्माण करुन गोदामांचा दर्जा उंचावणे	१७-१८	२२.२०	२२.२०	४.७७
५	वखार महामंडळाच्या राज्यातील गोदामांच्या फरश्यांची दुरुस्ती दर्जा सुधारणे आणि गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर जिल्हयातील वखार महामंडळांच्या वखार केंद्रांवर सिमेंट रस्त्यांची निर्मिती	१७-१८	२३.९९	२३.९९	७.७३
व्यवस्थापकीय संचालक (वखार महामंडळ)		**एकूण**	**९६.१९**	**७३.३२**	**१५.३८००**
एकूण			**३५२.९३**	**३१०.४३**	**२४.५५२१**